IMPACT FACTOR: 3.012 (IIJIF) ISSN: 2454-5503


# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. - 2 SPECIAL ISSUE - 1 NOVEMBER 2016

A Bimonthly Refereed International Journal

Special Issue On

# UNDERSTANDING THE CONSTITUTION OF INDIA



Chief Editors

PRIN. DR R.T.BEDRE

PRIN. DR T. L. HOLAMBE

Associate Editors

U. Y. MANE A. B. WALKE J. P. KOKANE

IMPACT FACTOR: 3.012 (IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE

## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 2 SPECIAL ISSUE 1 NOVEMBER 2016

A Bimonthly Refereed International Journal

Special Issue On

# UNDERSTANDING THE CONSTITUTION OF INDIA

*Chief Editors*

**Prin. Dr R.T.Bedre** **Prin. Dr T. L. Holambe**

*Associate Editors*

**U. Y. Mane** **A. B. Walke** **J. P. Kokane**

*Editorial Board*

**Dr H. P. Kadam** **Dr S. A. Tengse** **Dr S. T. Kawale**
**Dr V. J. Chavan** **Dr Manohar Sirsat** **Dr Kalyan Golekar**

CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)
Web: www.mgsociety.in +91 9420079975 Email: chcskalyan@gmail.com

25. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क आणि ... / वैशाली शिंगणे । 125
26. भारतीय राज्यघटनेतील समानतेचा हक्क आणि ... / प्रा. सुनिता टेंगसे । 135
27. भारतीय राज्यघटना आणि माध्यम स्वातंत्र्य / प्राचार्य. विठ्ठल एडके । 145
28. भारतीय राज्य घटनेमधील महिला व .... / -प्रा. सौ. जाधव एस.बी. । 146
29. भारतीय राज्यघटनेद्वारा अभिप्रेत लोकशाही..... / डॉ.कुंभारीकर एन.एन. । 150
30. भारतीय राज्यघटनेमधील महिला ... / सुजाता हजारे । 155
31. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार व ... / सालमोटे महालिंग । 160
32. भारतीय राज्यघटना : उपेक्षित... / डॉ. मोहन चौगुले , नवनाथ कुचेकर । 164
33. भारतीय संविधान आणि उपेक्षित अनुसूचित जमाती / प्रा. चांगदेव मुंढे । 171
34. भारतीय राज्य घटनेतील मुलभुत अधिकार ... / प्रा.लोखंडे बी.बी. । 176
35. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क / प्रा.डॉ. भगवान डोंगरे । 186
36. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार व.. / कल्पना साळुंके । 188
37. घटक राज्यांच्या निर्मितीत भाषांचे स्थान ... / रत्नमाला गोरे । 192
38. भारतीय राज्य घटनेतील मुलभूत अधिकार ... / शेळके जगदीश । 195
39. भारतीय संविधनाची वैशिष्टये / डॉ. जयदीप सोळूंके । 201
40. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार ... / राठोड दिलीप । 210
41. शाहू महाराजांच्या कल्याणकारी धोरणांचा ... / शिवशंकर कसबे । 216
42. भारतीय राज्यघटना-मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे / शिंदे अलका । 220
43. भारतीय राज्यघटनेतील दुर्बल घटकांच्या ... / प्रा. वितेश निकते । 226
44. मुलभूत अधिकारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी ... / भालेराव सचिन । 229
45. भारतीय राज्यघटनेव्दारा प्रदत्त शिक्षणाचा ... / प्रा. शशिकांत परळकर । 236
46. भारतीय राज्यघटनेतील उपेक्षीत वर्गासाठीच्या ... / डॉ. मानवते उत्तम । 241
47. भारतीय संविधान : काही अनुत्तरीत प्रश्नं / डॉ. आनंद शिंदे । 245
48. भारतीय राज्य घटनेतील मूलभूत... / प्रा.ए.डी. मुंडे, प्रा.डी.बी.गायकवाड । 249
49. भारतीय राज्यघटनेवर बौध्द धम्माचा प्रभाव / जामकर ए.आर. । 254


Late.Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani

# 26.

# भारतीय राज्यघटनेतील समानतेचा हक्क आणि महिला सबलीकरण

**प्रा. सुनिता आत्मरामजी टेंगसे**
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

स्त्री व पुरुष हे परस्पर पुरक घटक असून दोघांचेही जीवन एकमेकांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होत नाही. दोघेही संसाररुपी रथाचीर दोन चाके समजली जातात.हा रथ व्यवस्थित चालण्यासाठी दोन्ही चाकांची सारखीच आवश्यकता आहे. म्हणूनच मानवप्राणी या नात्याने स्त्रीया पुरुषांइतक्याच महत्वाच्या आहेत. आजपर्यंत जगातील बहुतांश समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले होते. त्यांना अनेक मानवी हक्कापासुन वंचित ठेवण्यात आले होते. स्त्री ही मानवी समाजाचा महत्वाचा घटक असूनही तीला पुरुषाच्या बरोबरीने अधिकार नाकारले जात आहेत. या वंचित घटकाच्या विकासासाठी त्यांना त्यांचे मुलभूत अधिकार मिळतील अशी व्यवस्था निमार्ण करणे आवश्यक आहे. स्त्रियांना विविध हक्कापासुन वंचित ठेवल्यामुळे स्त्रिया व संपुर्ण मानवी जातीच्या विकासाची गती ही मंदावली आहे. महिला विकास हा केवळ एकट्या स्त्रिचा विकास नाही तर तीच्या मुलाबाळांचा, कुटूंबाचा, समाजाचा इतकेच काय तर राष्ट्राचा विकास यांच्याशी तो निगडीत आहे.

प्रस्तुत शोध अध्ययनात महिलांचे मानवी हक्क व महिला सबलीकरण याची विश्लेषणात्मक चर्चा केली जाणार आहे. माहितीच्या उपलब्धतेसाठी संदर्भग्रंथे, नियतकालीके, मासिके, साप्ताहीके, वर्तमानपत्रे या दुय्यम सामग्रीचा उपयोग केला जाणार आहे. या **शोध अध्ययनाचा उद्देश** स्त्री-पुरुष समानतेच्या मानवी अधिकाराचे अध्ययन करणे व स्त्रियांच्या विकासात मानवीहक्काचे महत्व अभ्यासणे हा आहे. 'स्त्री किंवा पुरुष म्हणून जन्माला आल्यावर मानवाला जे नैसर्गिक अधिकार प्राप्त होतात त्यांना मानवीहक्क असे म्हणटले जाते.' १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत 'मानवी हक्कास आंतरराष्ट्रीय विधेयक म्हणून मान्यता मिळाली व १९७६ मध्ये पुरेशा सदस्य राष्ट्राच्या पाठिंब्या नंतर त्यास आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले. मानवीहक्काची संकल्पना नैसर्गिक हक्कातुन आली आहे. मानवी हक्क प्राप्त झाल्याशिवाय मानीव जीवनास स्थैर्य लाभत नाही.

भारतीय समाजात स्त्री - पुरुष भेदभाव पुर्वीपासुनच मोठ्या प्रमाणात केला जात होता. जागतिक पातळीवर ही स्थिती दुसऱ्या महायुध्दानंतर युरोपिनय स्त्रियां घराबाहेर अर्थार्जनासाठी पडल्याने काही प्रमाणात बदलली, तरी समाजात पूर्वापार चालत आलेल्या विचारसरणीत फारसा बदल झाला नव्हता. भारतात तर

मागासलेपणा व स्त्रियांचा दुय्यम दर्जा यात काही अंशी बदल झाला यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने पुढाकार घेतला. संयुक्त राष्ट्राच्या सनदेत स्त्रीयांच्या हक्काचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला. लिंगभेद न करता प्रत्येक व्यक्तीस समान मुलभूत हक्क व स्वांतत्र्य देण्याचे नमुद करण्यात आले. वंश, लिंग,भाषा किंवा धर्म या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांकरीता मानवी हक्क आणि मुलभूत स्वातत्र्ये वृध्दीगत करणे व त्यांना सन्मानप्राप्त करुन देणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे उदिष्ट आहे.

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते या युगात मानवी हक्कांना विशेष महत्व आहे. कारण आपण पाहतो की आज प्रत्येक व्यक्ती हा स्वार्थी बनला आहे. तंत्र वैज्ञानिक प्रगतीमुळे संपूर्ण जग जवळ येत असतांना माणुस माणसा पासुन दुर जात आहे. प्रत्येकजण आपल्या हिताचा विचार करत आहे. स्वार्थपुर्ती व सुखप्राप्तीसाठी माणसाची धडपड वाढतच आहे. अश्या विपरीत परिस्थितीत मानवी हक्काची संकल्पना आजच्या मानवास माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देते.

सामाजिक जीवन जगतांना व्यक्तीला स्वत:च्या विकास साधता यावा यासाठी संघटीत सामाजिक जीवनाची एक आत्यावश्यकता गरज आहे. मनुष्याला सुखी, संपन्न व सुरक्षित जीवनाच्या प्रगतीसाठी हक्क आवश्यक आहेत. व्यक्तीला मिळालेली सुवर्णसंधी म्हणजे हक्क होय. 'हक्क' ही व्यक्तीचा स्वाहितासाठी केली जाणारी मागणी होय. जेव्हा व्यक्तीची ही मागणी सामाजिक हिताशी सुसंवाद साधणारी असते तेव्हा त्या मागणीस समाजाकडुन स्वीकृती दिली जाते. जेव्हा राज्यसंस्था या मागण्यांवर आपल्या स्वीकृतीचा शिक्कामोर्तब करते तेव्हा या मागण्यांचे रुपांतर 'हक्कात' होते. 'हक्क' हे व्यक्तीगत हिताचे साधन नसून समाजिक हिताचे साधन आहे.

आजही स्त्रियांना दुय्यम दर्जा, अन्याय आत्याचार या सारख्या अनेक समस्या भेडसावत आहेत. वाढत जाणारे महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी व त्यांना माणुस म्हणून जगण्याचा हक्क व अधिकार प्राप्त करुन देण्यासाठी मानवी हक्काची आवश्यकता आहे. आज महिला शिक्षणाच्या साह्याने कमवत्या झाल्या असल्या तरीही सर्व महिलांपर्यंत हा हक्क पोचला नाही. विविध कारणास्तव शिक्षणापासुन वंचीत असलेल्या अर्धवट शिक्षण घेतलेल्या महिलांची संख्या काही कमी नाही. कौटूंबिक, राजकीय, सामाजीक, धार्मीक, आर्थिक, शैक्षणिक निर्णय प्रक्रियेपासुन आजही भारतीय महिला वंचीत आहेत. भारतीय संविधानाने महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करुन देणे, समान वेतन, स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे, संपत्तीत समान वाटा, वारस म्हणून स्विकारणे, अन्याया विरुध्द दाद महिलांना दिली

असली तरीही प्रत्यक्षात या पासून वंचीत असणाऱ्या महिलांची संख्या अधिक आहे. संविधानाने महिलांच्या हिताचे रक्षण व्हावे यासाठी जे हक्क, अधिकार, कायदे केले आहेत यासाठी आवश्यकता आहे ती स्त्री जागृतीची व समाजाची मानसिकता बदलण्याची.

Late.Ramesh Warpudkar College

**भारतीय राज्यघटना व मानवी हक्क :-**

भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या मुलभूत अधिकांरांचा समावेश केला आहे. मुलभूत अधिकारापैकी एक वा काही अधिकार व्यक्तीस नाकारल्यास त्याला आपन गुलामगीरीत आहोत असे वाटते. मुलभूत अधिकार व्यक्तिविकास बरोबरच लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी ही आवश्यक ठरतात. राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ पर्यंत नागरीकांचे मुलभूत अधिकार समाविष्ट केले आहेत. आणि भाग चार मध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे. भाग तीन मधील मुलभूत अधिकार व भाग चार मधील मार्गदर्शकतत्वे हे 'मानवी हक्क' आहेत.

भारतीय राज्यघटनेत सात प्रकारचे मुलभूत हक्क समाविष्ट केलेली आहेत. त्यांचा राज्यघटनेतील कलमनिहाय तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | समतेचा हक्क | १४ ते १८ |
| २ | स्वातत्र्यांचा हक्क | १९ ते २२ |
| ३ | शोषणाविरुध्दचा हक्क | २३ ते २४ |
| ४ | धार्मिक स्वातंत्र्यांचा हक्क | २५ ते २८ |
| ५ | सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क | २९ ते ३० |
| ६ | संपत्तीचा हक्क | ३० |
| ७ | न्यायालयात दाद मागण्याचा हक्क | ३२ ते ३५ |

व्यक्तीला राज्यघटनेने मुलभूत हक्क बहाल केलेली आहेत व त्यांच्या रक्षणाची जबाबदारी न्यायालयावर सोपवली आहे. काही मुलभूत हक्क व्यक्तीवर बंधने घालणारी आहेत तर काही नवीन हक्क देणारी आहेत.

भारतीय राज्यघटनेतील कलम १४,१५,१६, १९(१), २१,२३,२४,२५ ते २८, ३९ (अ), ३९ (ब) ४५ मधील तरतुदी महिला सक्षमिक्षकरणासाठी अत्यंत महत्वाच्या आहेत. या विविध कलमांव्दारे महिलांना विविध हक्क, अधिकार व संधीप्राप्त झाल्या आहेत. जसे की समानता, महिला कल्याणाच्या तरतुदी,नोकरीत समानसंधी, मुलभूत स्वातत्र्य, विविध हक्क त्याम जीवीताचा हक्क, व्यक्तिस्वातंत्र्यांचा हक्क, सन्मानाने काम करण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क, पिडीत महिलांना नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क इ, पिळवणुकीपासून संरक्षण, धार्मीक स्वातंत्र्याचा हक्क, हक्काचे उल्लंघन झाल्यास सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते,

उपजिवीकेचा समानहक्क, सामनकाम समानवेतन, या सर्व हक्क अधिकार व संधीव्दारे महिलांना ही कायदे महिलांच्या मानवीहक्क सरंक्षण व महिला सक्षमीकरणासाठी महत्वाचे आहेत.

## सारांश :-

भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार महिलांना कौटूंबीक , सामाजिक, राजकीय, अर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतीक या सर्व प्रकारचे मानवीहक्क पुरुषांच्या बरोबरीने देण्यात आल्यामुळे महिला सबलीकरणास गती देणाऱ्या आहेत. महिलांना पुरुषांप्रमाणे समानहक्क, अधिकारव संधी असल्यामुळे महिलांचे कौटुबीक, सामाजिक, राजकीय, शैक्षणीक, अर्थिक, धार्मिक सांस्कृतीक क्षेत्रात सक्षमीकरण घडुन येत असल्यामुळे मानवीहक्क महिलांच्या जीवनाच्या अस्तित्वाची कवचकुंडले बनली आहेत यात शंका नाही.

## संदर्भसूची.


१) 'समाजशास्त्राची मुलतत्वें' डॉ. पाटील, डॉ. आघाव, प्रा. रशीद, प्रा. शाकीर, कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद, २००९ पान. १००

२) 'भारतीय संविधान : शासन आणि राजकारण' प्रा. डॉ. विजयकुमार कुलकर्णी, कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद, फेब्रुवारी २००४ पान नं. ११

३) 'भारतीय राज्यघटना विकास, स्वरुप आणि राजकारण ' डॉ. शांताराम भोगले, विद्याभारती प्रकाशन, लातुर प्रथमावृत्ती जुन १९९७ पान नं. ६३.

४) 'भारताचे संविधान' ॲड के.टी. शिरुरकर, औरंगाबाद १ जाने २००० पानं. न. ५५.

५) 'मानवी हक्क' प्रा. एस. एस.देशपांडे चेतक बुक्स, पुणे, जुन २०१४ पान नं. ७९,८०

६) Role of Human Rights In Empowerment of Women, editor Dr. Deshmukh Feb २०१२. P.N.१८९, ९९,१६५,१८९

७) 'भारतीय राज्यघटना', डॉ. ठोंबरे, कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद, नोव्हे २०१०, पान नं. २०, २१.

८) समाजकल्याण, आणि सामाजिक अधिनियम डॉ. शेंडे, क्रिष्टीव्ह पब्लिकेशन, नांदेड, जुलै २०११, पान नं. १०८, १०९.

९) 'योजना', ऑगस्ट, २०११, पान नं. ५९

१०) 'योजना', ऑगस्ट २०१३, पान नं. १५

११) दै. 'देशोन्नती' १८/१२//११ (स्पंदन)


PRINCIPAL
Late Ramesh W... ...kar (ACS)
College, Sonpeth ...arbhani